॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो, जीवन सकारात्मकतेने बदला.

अहिल्यानगर | मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८२ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## वीरभूमी फोडणी
अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### विविधता
किती जाती, किती धर्म
इथे हजारो आहेत भाषा
विविधतेत एकता नांदते
फक्त आपल्या भारत देशा
हजारो वर्षांची परंपरा
अन संस्कृतीचा अभिमान
संतांची भूमी, वीरांचे शौर्य
आजही जपते स्वाभिमान

# जरांगे पाटील मुंबईला जाणारच
## मोजक्या ताफ्यासह आज रवाना?, चौकटीबाहेरील मागण्या अशक्य : मुख्यमंत्री

**मुंबई । वीरभूमी –** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. मुंबई पोलिसांनी त्यांना दोनदा आंदोलनाची परवानगी नाकारली असली तरी जरांगे यांनी मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंतरवालीतून मुंबईच्या दिशेने निघण्याचा निर्धार व्यक्त केला. ते १९ सप्टेंबर रोजी मुंबईत पोहोचतील आणि आझाद मैदानावर उपोषण सुरू करणार आहेत. काहीही झाले तरी आपण सरकारला शरण येणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे.



दरम्यान, मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या आंदोलनास परवानगी नाकारली तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जरांगे पाटलांच्या सर्व मागण्या मान्य केल्याचे म्हटले. संविधानाच्या चौकटीबाहेरील मागण्या शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शंभूराज देसाई म्हणाले, मनोज जरांगे पाटील ज्या काही गोष्टी बोलतात, त्या पूर्ण सत्य नसून अर्धसत्य आहेत आणि त्यामागे काही गैरसमजही आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी जरांगे पाटलांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सरकारच्या सर्व प्रक्रियेत सध्या प्रामाणिकपणे सुरू आहेत. सातारा गॅझेट आणि ५८ लाख कुणबी नोंदी यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर सरकार नियमानुसार आणि गांभीर्याने कायदेशीर पावले उचलत आहे, अशी माहिती मंत्री देसाई यांनी दिली. तसेच लवकरच प्रत्यक्ष भेट घेऊन मनोज जरांगे यांच्या मनातील सर्व गैरसमज दूर केले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


दरम्यान, मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली असली तरी आपण एकट्याने उपोषणाला जाणार असल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले. आपल्यासोबत इतर कुणीही मुंबईला जाणार नसून एकट्याने उपोषण करणार असल्याचे त्यांनी म्हटले. मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदाही कायदेशीर आणि सुरक्षेची कारणे देत उपोषण नाकारल्यामुळे जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम राहून मुंबई गाठणार की उच्च न्यायालयात दाद मागणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### एकट्याने आंदोलनासाठी मागितली परवानगी
राज्य सरकारने गणेशोत्सवाचे कारण देत आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करत जरांगे यांना परवानगी नाकारली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरांगेंना आंदोलनाचा फेरविचार करण्याची विनंती केली. जरांगे यांनी मात्र, आझाद मैदानावर एकट्याने आंदोलनाची परवानगी मिळावी, यासाठी पुन्हा अर्ज केल्याची माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली.

# दुर्मिळ योगायोग!, चंद्राच्या अगदी जवळ शुक्रताऱ्याचे दर्शन

**मुंबई । वीरभूमी –** आकाशात सोमवारी सायंकाळी एक वेगळाच योगायोग पाहायला मिळाला. खगोलप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे मनोहक दृश्य आकाशात पाहायला मिळाले. आकाशात दिसणाऱ्या नाजूक चंद्रकोरीच्या अगदी जवळ तेजस्वी शुक्र ग्रह चमकत असल्याचे दृश्य सर्वांना पाहता आले. हा योगायोग नागरिकांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला. अनोख्या आकाश दर्शनाने नागरिक आणि खगोलप्रेमींमध्ये कुतुहल वाढलेले पाहायला मिळाले.

आकाशात खगोलप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे मनोहारी दृश्य आज पाहायला मिळाले. आकाशात दिसणाऱ्या नाजूक चंद्रकोरीच्या अगदी जवळ तेजस्वी शुक्र ग्रह चमकत असल्याचे दृश्य नागरिकांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपले. १४ सप्टेंबर रोजी चंद्र आणि शुक्र ग्रहाची जवळची युती झाली. या खगोलीय घटनेमुळे



सूर्यास्तानंतर पश्चिमेकडील आकाशात चंद्रकोर आणि त्याच्या शेजारी चमकणारा शुक्र असा सुंदर नजारा पाहायला मिळाला. विशेष म्हणजे शुक्र हा आकाशातील सर्वाधिक तेजस्वी ग्रहांपैकी एक असल्याने तो चंद्राच्या शेजारी एखाद्या चमकत्या ताऱ्यासारखा स्पष्टपणे दिसत होता.

या अनोख्या आकाशदर्शनाने नागरिक आणि खगोलप्रेमींमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. सोशल मीडियावर या दृश्याचे व्हिडिओ आणि फोटो मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. ठळकपणे दिसणाऱ्या या खगोलीय घटनेने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.

## SPOT NEWS

### २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान विठ्ठल-रुक्मिणी मंदिर बंद राहणार
**मुंबई –** श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि राज्य पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे काम करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर भाविकांच्या मुखदर्शन व पदस्पर्शदर्शनासाठी पूर्णवेळ बंद राहणार आहे. २६ सप्टेंबरपासून दर्शन पूर्ववत सुरू होईल अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली. २२ सप्टेंबर रोजी दिवसभर दर्शन सुरू राहणार असून रात्री दर्शन बंद झाल्यानंतर संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाणार आहे. मूर्तींचे पावित्र्य आणि सुरक्षितता अबाधित ठेवून तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम अत्यंत काळजीपूर्वक केले जाणार आहे. मूर्ती संवर्धनाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या ७ ऑगस्ट रोजीच्या अंतिम आदेशाने न्यायालयीन अधिमान्यता मिळाली आहे.

### चीनने एलएसीवर सैनिकांची संख्या कमी केली
**नवी दिल्ली –** भारतीय लष्कराने २०२५–२६ च्या आपल्या वार्षिक अहवालात सांगितले आहे की, २०२५ मध्ये चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने एलएसीवर आपली तैनाती लक्षणीयरीत्या कमी केली आहे. एलएसीसमोर आणि चीनच्या पारंपरिक लष्करी प्रशिक्षण क्षेत्रांमध्ये आता सुमारे १० कंबाइंड आर्म्स ब्रिगेडच्या आकाराच्या लष्करी तुकड्या तैनात आहेत.

# शेवगावात तीन ठिकाणी वेश्या व्यवसायावर कारवाई
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई । तीन गुन्हे दाखल, आठ महिलांची सुटका

**शेवगाव । वीरभूमी –** शेवगाव शहरातील शिवनगर आणि नेहरूनगर परिसरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायावर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखा आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सोमवारी (दि. १४ सप्टेंबर) धडक कारवाई केली. या कारवाईत तीन जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, आठ महिलांची सुटका करण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक हमीद चाँद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईसाठी तीन पथके तयार करण्यात आली होती.

शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायाबाबत माहिती घेत असताना शिवनगर परिसरात निर्मला भाऊसाहेब कदम, नेहरूनगर परिसरात शबाना शरीफोद्दीन सय्यद आणि शिवनगर परिसरात अभिनव नंदू अंधारे हे वेगवेगळ्या ठिकाणी महिलांकडून अनैतिक व्यवसाय चालवत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानंतर पंचांसमक्ष बनावट ग्राहक पाठवून संबंधित ठिकाणी अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची खात्री करण्यात आली. खात्री झाल्यानंतर तिन्ही ठिकाणी छापे टाकून तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत निर्मला कदम हिच्या ठिकाणाहून तीन, शबाना सय्यद हिच्या ठिकाणाहून तीन, तर अभिनव अंधारे याच्या ठिकाणाहून दोन अशा एकूण आठ महिलांची सुटका करण्यात आली.

या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ मधील कलम ३, ४, ५, ७ आणि ८ अन्वये तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या कारवाईच्या पथकात पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, अनंत सालगुडे, संदीप दरवडे तसेच पोलीस अंमलदार शकील शेख, समीर सय्यद, अर्चना काळे, भाग्यश्री भिटे, ज्योती शिंदे, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, विष्णू भागवत, बाळासाहेब गुंजाळ, अमृत आढाव, किरण ठुबे, सुनील पवार, शामसुंदर जाधव, अभिजीत अरकल, दीपक जाधव, सुनीता पवार, बाळासाहेब खेडकर, राहुल द्वारके, सागर ससाणे, रोहित येमुल, बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, रिचर्ड गायकवाड, भीमराज खर्से, पंकज व्यवहारे, योगेश कर्डीले आणि चिमा काळे यांचा समावेश होता.

# घडलेल्या घटनांचे वृत्तांकन करणे बदनामी नव्हे

**नवी दिल्ली । वीरभूमी –** एखादे वृत्त कुणाला अप्रिय वाटले, तरी सत्य आणि वस्तुनिष्ठ तथ्यांचे वृत्तांकन बदनामी ठरत नाही, असे हिमाचल प्रदेश आणि झारखंड उच्च न्यायालयांच्या दोन स्वतंत्र निर्णयांतून स्पष्ट झाले आहे. हिमाचल प्रदेशच्या प्रवीण कुमार सैनी हे होमगार्ड म्हणून कार्यरत असतानाच ग्रामपंचायत, सदरपूरचे सरपंच म्हणून निवडून आले होते. त्यांच्या दोन्ही पदांबाबत तसेच त्यावरून निर्माण झालेल्या वादाचे वृत्त प्रसिद्ध केले. या वृत्तामुळे प्रतिष्ठेला धक्का बसल्याचा दावा सैनी यांनी केला. निवडणूक लढवण्यापूर्वी आपण ना–हरकत प्रमाणपत्र घेतले होते. मात्र, वृत्तपत्राने ही बाब योग्यरीत्या मांडली नाही, असे त्यांचे म्हणणे होते. दरम्यान पुरेसा आधार नसल्याने हा खटला रद्द करण्यात आला. हिमाचल प्रदेश हायकोर्टाने सैनी होमगार्ड असल्याचे आणि सरपंच म्हणून निवडून आल्याचे तथ्य निर्विवाद असल्याचे नमूद केले. तसेच, ना–हरकत बाबतचे त्यांचे स्पष्टीकरणही वृत्तपत्राने प्रसिद्ध केले होते. या पार्श्वभूमीवर खटला सुरू ठेवण्यास पुरेसा आधार नसल्याचे सांगत खटला रद्द केला. वृत्तांकन करणे हा प्रसारमाध्यमांचा मूलभूत हक्क आणि कर्तव्य दोन्ही आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रसारमाध्यमांना जनतेपर्यंत सत्य, अचूक आणि निपक्षपाती माहिती पोहोचवण्यासाठी वृत्तांकन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्यघटनेच्या संदर्भातून आणि लोकशाहीच्या दृष्टिकोनातून या हक्काचे महत्त्व खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल. घटनात्मक आधार कलम १९(१)(अ) संविधानाने प्रत्येक नागरिकाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. प्रसारमाध्यमांचा वृत्तांकनाचा हक्क याच कलमांतर्गत येतो. माहितीचा अधिकार जनतेला देशात काय चालले आहे हे जाणून घेण्याचा अधिकार आहे आणि माध्यमांच्या वृत्तांकनामुळेच हा अधिकार खऱ्या अर्थाने अमलात येतो. लोकशाहीचे रक्षण आणि सरकार, प्रशासन आणि संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवून, त्यांच्यातील त्रुटी किंवा भ्रष्टाचार जनतेसमोर आणण्याचे काम वृत्तांकनाद्वारे होते.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र यावे
## घनश्याम शेलार यांचे आवाहन । खा. नीलेश लंके, आ. काशिनाथ दाते यांचा पाठिंबा

**पारनेर, निघोज । वीरभूमी –** कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळण्यासाठी डिंभे–माणिकडोह बोगदा होणे अत्यावश्यक आहे. डिंभे धरणातील अतिरिक्त पाणी माणिकडोह धरणात आणल्यास कुकडी डाव्या कालव्याला अपेक्षित असलेले ६.२१ टीएमसी पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, करमाळ्यासह कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. या प्रश्नासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून एकत्र यावे, असे आवाहन घनश्याम शेलार यांनी सोमवारी पारनेर येथे पत्रकार परिषदेत केले.

शेलार यांनी खासदार डॉ. नीलेश लंके आणि आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेऊन डिंभे–माणिकडोह बोगद्याच्या प्रश्नावर चर्चा केली. दोन्ही लोकप्रतिनिधींनी बोगद्याच्या मागणीला पाठिंबा दिल्याचे शेलार यांनी सांगितले. खासदार लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांना पत्र देऊन या विषयावर बैठक घेण्याची मागणी करण्याचे आश्वासन दिले, तर आमदार दाते यांनीही बोगदा झालाच पाहिजे, अशी भूमिका स्पष्ट केल्याचे त्यांनी सांगितले.

कुकडी प्रकल्पात डिंभे, माणिकडोह, पिंपळगाव जोगे, वडज आणि येडगाव या पाच धरणांचा समावेश आहे. कुकडी डाव्या कालव्याची लांबी सुमारे २४९ किलोमीटर असून पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांतील सुमारे ८९ हजार हेक्टर क्षेत्राला या प्रकल्पाच्या पाण्याचा लाभ मिळतो. जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत आणि करमाळा तालुक्यांतील शेती मोठ्या प्रमाणात या पाण्यावर अवलंबून आहे.

डिंभे धरणाची क्षमता सुमारे १२ टीएमसी, माणिकडोहची १० टीएमसी, तर येडगाव धरणाची क्षमता १.८४ टीएमसी आहे. डिंभे धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी खाली वाहून जाते. मात्र हे पाणी कुकडीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात मिळत नाही. डिंभे ते येडगाव या सुमारे ५५ किलोमीटरच्या कालव्यातून पाणी सोडले जाते. या कालव्यातील गळती आणि वारंवार होणाऱ्या फुटीमुळे पाणी अपेक्षित ठिकाणी पोहोचत नसल्याचा दावा शेलार यांनी केला.

डिंभे–माणिकडोह बोगद्याला काही लोकप्रतिनिधींचा विरोध असून, त्यामुळे खालच्या भागातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावर परिणाम होत असल्याचा आरोप शेलार यांनी केला. संबंधित भागाचा विकास करण्यास कोणाचीही हरकत नाही; मात्र एका भागाच्या गरजा पूर्ण करताना कुकडीच्या लाभक्षेत्रातील इतर शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बोगद्याचा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणून तो पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले. प्रा. राम शिंदे यांनीही प्रशासकीय मान्यतेसाठी पाठपुरावा केला. या प्रश्नासाठी आपण यापूर्वी विविध स्तरांवर पाठपुरावा केला असून, आता नगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना एकत्र करून मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे शेलार यांनी सांगितले.

पक्षीय राजकारण बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र यावे. बोगद्याला असलेली स्थगिती उठवून काम पुढे नेण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. हा प्रश्न मार्गी न लागल्यास कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचे भवितव्य अडचणीत येईल, असे शेलार यांनी सांगितले.



SPOT NEWS



## खिरविरे येथे राष्ट्रीय पोषण माह निमित्त मार्गदर्शन

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील खिरविरे येथे एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प अकोले अंतर्गत नवचेतन व आधारशिला यांच्या माध्यमातून नववा राष्ट्रीय पोषण माह कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास खिरविरे केंद्राच्या पर्यवेक्षिका इंदिरा सोनवणे तसेच खिरविरे गटातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रास्ताविका पर्यवेक्षिका इंदिरा सोनवणे यांनी केली. त्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. ग्रामस्थांच्या उपस्थितीत लहान बालकांच्या पावलांनी कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. बालकांना सकस व पौष्टिक आहार मिळावा तसेच महिलांना परिसरात उपलब्ध असलेल्या रानभाज्या, कडधान्ये आणि विविध पौष्टिक पदार्थांची माहिती व्हावी, यासाठी कार्यक्रमस्थळी विविध माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते. यामध्ये गावरान पालेभाज्या, विविध कडधान्ये, खेळणी तसेच पौष्टिक आहाराशी संबंधित साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषण आहाराचे महत्त्व, आहारातील विविधता, पुरेशा प्रमाणात प्रथिनांचा समावेश तसेच अंगणवाडी केंद्रात दिला जाणारा ताजा व गरम शिजवलेला आहार याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. बालकांच्या आरोग्यासाठी संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. यावेळी इंदिरा सोनवणे, रंजना दिंडे, पार्वताबाई डगळे, प्रा. संगिता डगळे, द्रौपदा रावते, सुदाम आवारी, त्रिंबक पराड, उपसरपंच सुभाष बेनके, सौरभ बेनके तसेच खिरविरे गटातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. संगिता डगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अहिल्यानगरमध्ये तायक्वांदो पंच परीक्षा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

इंडिया तायक्वांदोच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनच्या अंतर्गत तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन, अहिल्यानगर व एकलव्य तायक्वांदो अकॅडमी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंच परीक्षा उत्साहात पार पडली. झेंडा चौक, भूषण नगर, केडगाव येथील आर.एम.टी. बिझनेस सेंटरमध्ये नुकतीच ही परीक्षा घेण्यात आली. या पंच परीक्षेसाठी परीक्षक म्हणून उत्तराखंडचे आंतरराष्ट्रीय पंच गौरव सिंह उपस्थित होते. त्यांनी सहभागी पंचांना तायक्वांदो खेळातील विविध तंत्रे, सामन्यांचे नियम, पंचांची भूमिका, निर्णयप्रक्रिया तसेच तंत्रशुद्ध पद्धतीने खेळाचे संचालन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियम व पंचगिरीतील बारकावे समजून घेण्यासाठी ही परीक्षा व मार्गदर्शन कार्यशाळा उपयुक्त ठरली. यावेळी महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष घनश्याम सानप, क्रीडा राज्य मार्गदर्शक संतोष वाबळे आणि ज्येष्ठ मार्गदर्शक अल्ताफ खान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत पंच परीक्षेतील सहभागींचा उत्साह वाढला. या पंच परीक्षेत गणेश वंजारे, योगेश बिचितकर, युवराज लोखंडे, मंगेश आहेर, तेजअंकित बोंगाडे, वैष्णवी पाटोळे, ओमकार पवार, पियुष सहानी, अमित लोंढे, सचिन कोतकर, चंद्रकांत बिरारे, असता तोमर आणि सबा खान यांनी सहभाग नोंदविला. तायक्वांदो हा शिस्त, अचूकता आणि नियमबद्धतेवर आधारित खेळ असून, पंचांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे पंचांना अद्ययावत नियमांची माहिती असणे तसेच सामन्यादरम्यान योग्य व निष्पक्ष निर्णय घेण्याचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे यावेळी गौरव सिंह यांनी सांगितले.

# ढोल-ताशांच्या निनादात पाथर्डीत बाप्पाचे आगमन

### डीजेला फाटा । लेझीम, पारंपरिक वाद्ये, मर्दानी खेळ आणि लोककलेने सजला गणेशोत्सव

**● पाथर्डी । वीरभूमी –**

यंदा तब्बल १२ दिवसांच्या मुक्कामासाठी आलेल्या लाडक्या गणरायाचे पाथर्डी शहरासह तालुक्यात आणि घरोघरी मंगळवारी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. सकाळपासूनच शहराचे वातावरण गणेशमय झाले होते. दुपारपर्यंत बहुतांश घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना झाली, तर सार्वजनिक गणेश मंडळांनी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत भव्य मिरवणुका काढत श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली.

यंदाच्या गणेशोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे शहरातील स्वागत मिरवणुकांमध्ये प्रथमच कुठेही डीजेचा दणदणाट ऐकू आला नाही. त्याऐवजी पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशे, लेझीम आणि मर्दानी खेळांच्या साथीने गणरायाचे स्वागत करण्यात आले.

शहरातील मानाचे नवोदय, जय भवानी, गणेश पेठ, कसबा, दगडमठ, दोस्ती तरुण मंडळ, सुवर्णयुग परिवार ट्रस्ट, श्रीराम मित्रमंडळ, अष्टवाडा, बाजारकरी, व्यापारी, न्यू दोस्ती, साई सेवा मंडळ, नाथनगर, वामनभाऊ नगर, वेताळबाबा, सीआरपी बॉईज, एकलव्य, जगदंब युवा प्रतिष्ठान, मोरया प्रतिष्ठान, संत वामनभाऊ, छत्रपती शिवाजी महाराज ग्रुप, शेवगाव रोडचा राजा, नाथनगरचा राजा, विघ्नहर्ता आदी मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या निनादात मिरवणुका काढत बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले.

साई सेवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी मंडळातील बालचिमुकल्यांच्या पारंपरिक



लेझीम पथकासह भव्य मिरवणूक काढली. चिमुकल्यांच्या उत्साहाला नागरिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सायंकाळी नगराध्यक्ष अभय आव्हाड व सौ. कविता आव्हाड यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सुवर्णयुग तरुण मंडळाची पारंपरिक वाद्यांच्या निनादातील भव्य मिरवणूक शहराच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. राज्यातील सुप्रसिद्ध करकंब येथील हलगी पथक, जामखेड येथील शंभू सूर्य ग्रुपचे मर्दानी खेळ आणि मल्लखांबाची प्रात्यक्षिके मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.

लोप पावत चाललेल्या लोककला व लोककलावंतांना पुन्हा लोकाश्रय मिळावा, या सामाजिक संदेशावर आधारित 'हरवलेले सूर, हरवलेले कलावंत' हे हृदयस्पर्शी पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली. आकर्षक फुलांनी सजवलेल्या पालखीत स्थानापन्न केलेली गणेशमूर्ती आणि एकाच गणवेशातील मंडळाचे कार्यकर्ते यामुळे सुवर्णयुगची मिरवणूक अधिक देखणी व शिस्तबद्ध दिसत होती.

सकाळी नवीपेठेत प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक आणि नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते गणेशपूजन व श्रीफळ वाढवून सुवर्णयुगच्या मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, ट्रस्टचे अध्यक्ष वैभव शेवाळे, उपाध्यक्ष उमेश रासने, उद्योजक महेश पाथरकर, मुन्ना खलिफा, नगरसेवक प्राचार्य अजय भंडारी, मुकुंद लोहिया, बंडूशेठ दानापुरे, अभय गांधी, मुकुंद सुराणा, दिगंबर जोजारे, गणेश महालकर आदी उपस्थित होते.

नगरसेवक ॲड. प्रतीक खेडकर यांच्या 'पाथर्डीचा राजा' तसेच जगदंब युवा प्रतिष्ठानच्या मिरवणुकीतील दमदार ढोल पथकानेही नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांचा निनाद, पारंपरिक वाद्यांची साथ आणि गणेशभक्तांचा उत्साह यामुळे संपूर्ण शहर भक्तिमय झाले होते. मिरवणूक मार्गावर गणरायाचे दर्शन घेण्यासाठी हजारो नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली. आबालवृद्ध, महिला आणि युवकांनी मिरवणुकांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत गणरायाच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला.

दरम्यान, शहरासह वाड्या-वस्त्यांमध्ये यंदा सुमारे ४० सार्वजनिक गणेश मंडळांनी श्री गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्ये, लोककला, मर्दानी खेळ आणि सामाजिक संदेशाला प्राधान्य देणाऱ्या यंदाच्या गणेश प्रतिष्ठापनेतून पाथर्डीच्या गणेशोत्सवाची सांस्कृतिक व सामाजिक जडणघडण अधोरेखित झाली.

### पालिकेच्या नियोजनामुळे वाहतूक कोंडी टळली

■ यंदा पाथर्डी नगरपालिकेने गणेशमूर्ती व सजावट साहित्याच्या स्टॉलसाठी बाजारतळात स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली. त्यामुळे शहरातील चौकाचौकांत होणारी गर्दी, वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात टळली. सकाळपासून गणेशमूर्ती तसेच पूजाविधीसाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी बाजारतळात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

## ॲड. के. डी. धुमाळ यांना 'आनंदोत्सव'चा जीवनगौरव पुरस्कार

**● अकोले । वीरभूमी–**

गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च सन्मान मानला जाणारा 'जीवनगौरव पुरस्कार २०२६' अकोले तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. के. डी. धुमाळ यांना जाहीर झाला आहे. ट्रस्टचे चेअरमन प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी ही माहिती दिली.



साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या अनुदानातून तसेच आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तरीय साहित्य संमेलनात ॲड. धुमाळ यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. हे संमेलन दि. २४ व २५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात होणार आहे. श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग महाप्रकल्पाच्या संयोजनातून संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ॲड. धुमाळ हे ख्यातकीर्त विधिज्ञ असून अकोले नगरपंचायतीचे पहिले नगराध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. संस्कृती, कला व क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या अजिंक्य क्रिकेट क्लबचे ते अध्यक्ष आहेत. तसेच पर्यावरणप्रेमी, ज्येष्ठ सामाजिक व सांस्कृतिक कार्यकर्ते म्हणून त्यांचे योगदान आहे. अकोले येथील महर्षी अगस्तिमुनी आश्रमाचे ते सेवाभावी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

'प्रवरा परिक्रमा' या सांस्कृतिक, जल व पर्यावरणविषयक उपक्रमाचे ते मार्गदर्शक असून साखर कारखाना, सहकारी सोसायट्या, दूध संघ आदी विविध संस्थांच्या व्यवस्थापनातही त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे. आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने यापूर्वी विविध क्षेत्रातील मान्यवरांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## पारनेर तालुक्यात गणरायाचे उत्साहात आगमन

### ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण । 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यात गणेशोत्सवाला मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. गणेश चतुर्थीनिमित्त विविध गावांमध्ये गणरायाच्या मूर्तींची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. सकाळपासूनच गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने तालुक्यातील विविध भाग दुमदुमून गेले.

गणेशमूर्ती घरी आणण्यासाठी बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. आकर्षक सजावट केलेली वाहने, फुलांची आरास आणि ढोल-ताशांच्या गजरात गणरायाच्या मिरवणुका काढण्यात आल्या. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत नागरिकांनी मिरवणुकांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. काही ठिकाणी लेझीम पथकांनी सादरीकरण करत मिरवणुकीची शोभा वाढवली, तर युवकांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर नृत्य करत आनंद व्यक्त केला.



तालुक्यातील सार्वजनिक गणेश मंडळांनी आकर्षक सजावटीबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक मंडळांनी शाडू मातीच्या गणेशमूर्तींना प्राधान्य दिले आहे. प्लास्टिकचा वापर टाळणे, स्वच्छता राखणे, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचेही नियोजन करण्यात आले आहे.

गणेशमूर्तींच्या प्रतिष्ठापनेपूर्वी घराघरांत स्वच्छता व सजावट करण्यात आली. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चेची तयारी केली. गणरायाच्या स्वागतासाठी घरांना आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि पोलिस यंत्रणेकडूनही आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मिरवणुकांदरम्यान वाहतूक सुरळीत राहावी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी तालुक्यात भक्तिमय वातावरणामुळे उत्साहाला उधाण आले असून, पुढील दहा दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.

# शेवगाव शहरासह तालुक्यात जल्लोषात 'श्रीं'ची प्रतिष्ठापना

### पावसाच्या आगमनाने गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित । शहरात २५, तालुक्यात ८१ मंडळांची नोंदणी

**● शेवगाव । वीरभूमी–**

गेल्या तीन महिन्यांपासून पावसाने दडी मारली होती. मात्र, दोन दिवसांपासून तालुक्यात कमी-अधिक प्रमाणात पाऊस सुरू झाल्याने गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित झाला आहे. लाडक्या गणरायाच्या वाजत-गाजत मिरवणुका काढून विविध सार्वजनिक मंडळांसह घरोघरी मोठ्या उत्साहात श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

सोमवारी (ता. १४) गणरायाच्या आगमनासाठी सार्वजनिक गणेश मंडळांची तसेच घरगुती गणपती प्रतिष्ठापनेसाठी नागरिकांची लगबग सुरू होती. गणेशमूर्ती, पूजा साहित्य आणि सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत दिवसभर मोठी गर्दी झाली होती. गुलाल, कापसाच्या वाती, कापूर, धूप, तेल, अगरबत्ती, दूर्वा, फळे, पान-फुले, जानवे, श्रीफळ आदी पूजासाहित्याबरोबरच सजावटीसाठी हार, तोरण, चक्र, मखर आदींची दुकाने गजबजली होती. सायंकाळपर्यंत गणेशमूर्तींच्या दुकानांमध्ये भाविकांची खरेदीसाठी वर्दळ सुरू होती.

तालुक्यातील आव्हाणे बुद्रुक येथील निद्रिस्त गणेशाचा उल्लेख थेट गणेशपुराणात असल्याचे सांगितले जाते. निद्रिस्त अवस्थेतील गणेशमूर्तीप्रमाणे मूर्ती अन्यत्र आढळत नसल्याचे मानले जाते.

शेवगावला गणेशोत्सवाची मोठी परंपरा असून येथील काही गणपती टिळककालीन आहेत. मानाचा पहिला लाटे गणपती १८९५ मध्ये बापू दादाजी लाटे यांनी स्थापन केला. आज त्यांची



चौथी पिढी या गणपतीची प्रतिष्ठापना करते. राजभोई पंच मंडळाचा मानाचा दुसरा गणपती १९१२ मध्ये स्थापन झाला. माळी गल्ली सार्वजनिक मंडळाचा तिसऱ्या क्रमांकाचा गणपती १९२२ मध्ये, तर खालची वेस गणेश मंडळाचा मानाचा गणपती १९२३ मध्ये स्थापन झाला आहे.

गणरायाची प्रतिष्ठापना करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांची ऑनलाइन नोंदणी करण्यात आली असून, शेवगाव शहरात २५, तर तालुक्यात ८१ गणेश मंडळांनी श्रींची प्रतिष्ठापना केली आहे. तसेच आतापर्यंत ३८ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्यात आली आहे, अशी माहिती गुप्तवार्ता विभागाचे पोलीस कॉन्स्टेबल राजू केदार यांनी दिली.

### डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी पोलिसांचा सज्जड इशारा

■ गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी पोलीस दलाने शांतता समितीच्या बैठका घेतल्या आहेत. तसेच दंगल नियंत्रणाचे प्रात्यक्षिक घेऊन आकस्मिक प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी पोलीस दल सज्ज असल्याचे दाखवून दिले आहे. गणेशोत्सवातील मिरवणुका डीजेमुक्त वातावरणात होणार असून सार्वजनिक गणेश मंडळांनी यासाठी सहकार्य करावे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा पोनि. मोहन बोरसे यांनी दिला आहे.

## SPOT NEWS



## पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांचा उत्कृष्ट कामगिरी बद्दल सन्मान

**अकोले । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या दहशतवादविरोधी पथकात कार्यरत असताना उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी बजावणारे अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांचा जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सन्मान करण्यात आला. दहशतवादविरोधी पथक, अहिल्यानगर येथे कार्यरत असताना जिल्ह्यातील गोपनीय तसेच महत्त्वाच्या कामकाजात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची आणि उल्लेखनीय कामगिरीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली. त्यांच्या या कार्यामुळे अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यास मोलाची मदत झाली. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन (भा.पो.से.) यांच्या हस्ते पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. दरम्यान, वरिष्ठांकडून मिळालेल्या या सन्मानाबद्दल अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी, सपोनी हजारे, पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ यांच्यासह अकोले पोलीस स्टेशनमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र इंगळे यांचे अभिनंदन केले.

## शाडूच्या गणेशमूर्तींतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**श्रीगोंदा । वीरभूमी–**

महादजी शिंदे विद्यालय व ज्यु. कॉलेज ऑफ सायन्समध्ये कला विभागातर्फे 'पर्यावरणपूरक श्री गणेशमूर्ती प्रदर्शन व सजावट स्पर्धा २०२६' उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती साकारत टाकाऊ व नैसर्गिक साहित्याचा कल्पक वापर करून आकर्षक सजावट केली. प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड व पर्यवेक्षिका सुनीता काकडे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी कलात्मकतेसोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या विविध कलाकृती साकारल्या. कलाशिक्षक शरद शिरसाट व कल्याण उल्हारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमातून 'कलेतून पर्यावरण जागृती' तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यात आला. पालक, शिक्षक व नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# श्रीगोंद्यात फोफावत असलेल्या आकाचे 'प्रताप' थांबता थांबेनात..

**वाळू -मुरूम माफिया, भूमाफिया, स्वयंघोषित गोरक्षक माफिया, गुटखा-मटका माफिया यांना पोसणारा आका राजकीय जहाज डुबवण्याची शक्यता...**

**विजय उंडे**

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा तालुक्याची ओळख गेल्या ४५ वर्षात एक सुसंस्कृत तालुका म्हणून राज्याला परिचित होता. जुन्या – जाणत्या नेत्यांनी या तालुक्याला चांगले वळण लावण्याचा नेहमीच प्रयत्न केला. मात्र अलीकडे तालुक्याची सूत्रे तरुण नेत्यांकडे गेली. या नव्या राजकारणात असंवैधानिक घटनाबाह्य आका निर्माण झाला असून त्याचे 'प्रताप' एवढे महाभयंकर आहेत की श्रीगोंदा तालुका बदनामीच्या महाशिखरावर पोहोचला आहे.

मागील पंधरा दिवसात दोन किळसवाण्या घटना श्रीगोंदा तालुक्यात घडल्या. टाकळी लोणार – पिसोरेखांड रस्त्यावर प्रतिक पाचपुते नावाच्या तथाकथित गोरक्षकाने दुभती गाय घेऊन जात असलेल्या शेतकऱ्याला अमानुषपणे बेदम मारहाण केली व त्या शेतकऱ्याला मूत्र पाजण्यापर्यंत मजल गेली. या गोरक्षकाला पोसणाऱ्या आकाची तालुकाभर चर्चा आहे. तालुका आपल्या मालकीचा असल्याप्रमाणे हा आका सध्या वावरत आहे. या आकाचे श्रीगोंदा तालुक्यात घटनाबाह्य सत्ताकेंद्र उदयास आले असून राजकीय पाठबळाच्या जोरावर हा आका अधिकाऱ्यांना त्याला हवे तसे वाकवत असून दोन नंबरवाल्यांना कायद्यातून



सुटण्याचे संरक्षण पुरवित आहे. यातूनच ही गुंडगिरी तालुक्यात फोपावली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील या गुंडगिरीचे उगमस्थानच हाच आका असून याला आवर घालण्याची काळाची गरज आहे.

लोणी व्यंकनाथ हद्दीत मंजूर झालेली एमआयडीसी अजून कागदावरच आहे मात्र अत्यंत सुपीक अशा जमिनीत ही एमआयडीसी होणार आहे. या तथाकथित आकाचे लक्ष्य त्या सुपीक जमिनीतील काळ्या मातीवर गेले. अनधिकृतपणे ही काळी माती उपसण्याचा सपाटा या आकाच्या मार्गदर्शनाखाली गुंडांनी सुरू केला. चिंभळा, लोणी व्यंकनाथ, येळपणे, बेलवंडी या परिसरात चौका चौकात गुंडांचे टोळके जमा होऊ लागले. या गुंडांचे कारनामे 'रात्रीस खेळ चाले' याप्रमाणे सुरू झाले. आम्ही भैय्याची माणसे म्हणून हे गुंड राजरोसपणे मिरवू लागले. दोन महिन्यापूर्वी येळपणे येथील जमावाने या गुंडांवर हल्ला केला. त्यावेळी तेथे गोळीबार झाला. त्या गोळीबार प्रकरणातील आरोपींना अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केली मात्र राजकीय पाठबळाच्या जोरावर त्यांना चारच दिवसात जामीन झाला. आकाच्या जीवावर आपले कुणीही वाकडे करू शकत नाही याचा आत्मविश्वास या गुंडांमध्ये वाढीस लागला. यातून बेलवंडीच्या तरुणांवर जीवघेणा हल्ला केला.

श्रीगोंदा तालुक्यात अधिकारी बदली करून आणले जात असताना केवळ आणि केवळ आम्ही सांगू तेच करायचे या एकाच बोलीवरती आणले जातात. आकाच्या रूपाने घटनाबाह्य सत्ताकेंद्र निर्माण करून या अधिकाऱ्यांचा वापर दोन नंबरची मलई खाण्यासाठी केला जातोय. श्रीगोंदा तालुका हा धोबीपछाड देणारा तालुका आहे. बोटावर मोजण्याइतके कार्यकर्ते नसताना स्व. दिलीप गांधी यांना तीनवेळा चाळीस हजाराच्यावर मताधिक्य या तालुक्याने दिले. तालुक्यातील सगळे नेते एका बाजूला असताना खा. निलेश लंके यांना याच तालुक्याने मताधिक्य दिले आणि ते निवडून आले. या तथाकथित आकाचे 'प्रताप' भविष्यात असेच चालू राहिले तर धोबीपछाड व्हायला वेळ लागणार नाही हे निश्चित.

### अटकपूर्वमुळे गुंड प्रवृत्ती फोफावते..

श्रीगोंदा तालुक्यात अलीकडच्या काही दिवसात अनेक गंभीर गुन्ह्यातील आरोपींना अटकपूर्व जामीन मिळत आहेत. हे अटकपूर्व जामीन कसे व कोणामार्फत मिळत आहेत या खोलात न्यायालयीन चौकटीत राहून आम्ही जात नाहीत. परंतु अटकपूर्व जामीन झाल्यानंतर या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुंडांनी लगेचच गंभीर गुन्हे केल्याचे निदर्शनास येत आहे.

### तालुक्याला आठवण येते स्व. सदाअण्णांची..

स्व. सदाअण्णा पाचपुते यांनी श्रीगोंदा तालुक्यावर तिस वर्षे अधिराज्य गाजवले. सदाअण्णा सर्वसामान्य माणसांना आधार वाटायचे. अधिकाऱ्यांकडून कायद्याच्या चौकटीत बसतील असेच कामे करून घ्यायचे. राजकीय तोटा होईल अशा प्रवृत्तींना दोन हात दूर ठेवायचे. सामाजिक काम व निधीचा त्यांनी बाजार होऊ दिला नाही. त्यामुळे तालुक्याला पदोपदी अण्णांची आठवण येत आहे.

## शेतकऱ्याच्या मनात उतरून लिहिलेले साहित्य अधिक अस्सल

**राजेंद्र फंड । १५ वे अखिल भारतीय ऑनलाइन मराठी शेतकरी साहित्य संमेलन उत्साहात**

**राहाता । वीरभूमी –**

शेतीसाहित्याशी निगडित बहुचर्चित अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे आयोजन संमेलनाचे आयोजक गंगाधर मुटे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी खुले आणि ऑनलाइन पद्धतीने केले जाते. या संमेलनात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर साहित्यिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून चर्चा केली जाते. यंदाचे १५ वे अखिल भारतीय ऑनलाइन मराठी शेतकरी साहित्य संमेलन ३ ते ९ सप्टेंबरदरम्यान संपन्न झाले.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्यिक उपेंद्र महात्मे, उद्घाटक म्हणून अनिलकुमार जवादे, तर स्वागताध्यक्ष म्हणून सारंग दरणे यांनी काम पाहिले. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश बोरुळकर आणि शेतकरी नेते दिलीप भोयर हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. समारोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक राजेंद्र फंड होते.

समारोपीय सत्रात कवी व लेखकांना मार्गदर्शन करताना राजेंद्र फंड म्हणाले की, हे संमेलन केवळ साहित्यिकांचा मेळावा नाही; तर मातीशी नाते सांगणाऱ्या, शेतकऱ्याच्या जगण्याला शब्द देणाऱ्या आणि ग्रामीण जीवनातील वेदना, संघर्ष, स्वप्ने व संवेदना जपणाऱ्या साहित्यिकांचे व्यासपीठ आहे.

शेतकरी साहित्य म्हणजे केवळ शेत, पाऊस, बैल, विहीर आणि पिकांचे वर्णन नव्हे. शेतकऱ्याचे जगणे समजून घेणे, त्याच्या कष्टामागची भावना जाणून घेणे, चेहऱ्यावरील हास्य आणि डोळ्यांतील अश्रू टिपणे, त्याच्या आशा-निराशांना शब्द देणे तसेच संघर्षामधील स्वाभिमान समाजासमोर आणणे म्हणजे शेतकरी साहित्य होय. त्यामुळे शेतकरी साहित्य हे केवळ एका वर्गाचे साहित्य नसून महाराष्ट्राच्या मातीचे साहित्य आहे, असे फंड यांनी स्पष्ट केले.

आजच्या डिजिटल युगातील बदलत्या शेतीव्यवस्थेवर भाष्य करताना ते म्हणाले की, शेती, गाव आणि शेतकरी यांच्यातही मोठे बदल होत आहेत. शेतकऱ्याच्या हातात मोबाईल आला असून नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. शिक्षित तरुण शेतीकडे नव्या दृष्टीने पाहत आहेत. या बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटले पाहिजे. आजच्या शेतकऱ्याची नवी भाषा, नवी स्वप्ने आणि नवी आव्हाने साहित्याने टिपली पाहिजेत. केवळ भूतकाळाचे गौरवगीत गाण्यापेक्षा वर्तमान समजून घेऊन भविष्याचा वेध घेणे, ही साहित्याची खरी ताकद आहे, असे त्यांनी सांगितले.

महात्मा फुले आणि युगात्मा शरद जोशी यांनी आपल्या लेखनातून शेतीविषयक विचार मांडले. हे विचार शेतकरी नेते गंगाधर मुटे यांनी जाणले आणि गावागावातून शेतकरी विचारांचा साहित्यिक घडला पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी शेतकरी साहित्य संमेलनाची निर्मिती केली. त्यामुळे आज अनेक जण शेतकरी प्रश्नांवर लिहू लागले आहेत. लेखणीची ताकद कमी समजू नका. साहित्याची ताकद राजकीय सत्ता बदलू आणि हलवू शकते, असे फंड यांनी नमूद केले.

या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य ठरलेला शेतकरी गझल मुशायरा हा उपक्रमही त्यांनी अधोरेखित केला. या उपक्रमामुळे आज साहित्यक्षेत्रात गझलकारांचा मोठा वर्ग तयार झाला असून, त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध समस्या, त्यावरील उपाययोजना आणि ग्रामीण जीवनातील प्रश्नांवर प्रभावीपणे चर्चा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## राजगड भूमीत शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या १०६ महिन्यांच्या शिवकार्याचा सन्मान



**श्रीगोंदा । वीरभूमी –**

गडकोट संवर्धन, प्लॅस्टिकमुक्ती, बारव संवर्धन आणि पानिपत वारसा जतनाच्या माध्यमातून ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या कार्याचा भोर-राजगड-मुळशीचे आमदार शंकरभाऊ मांडेकर यांच्या वतीने राजगड भूमीत गौरव करण्यात आला. संस्थेच्या सलग १०६ महिन्यांच्या अखंडित गडभ्रमंतीनिमित्त तसेच किल्ले तोरणा येथील १०६ व्या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर हा सन्मान सोहळा झाला.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने गेल्या १०६ महिन्यांत १०६ गडकोटांची भ्रमंती करत छत्रपती शिवरायांचा विचार तरुणांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. गडभ्रमंतीच्या माध्यमातून तरुणांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, इतिहासाची आवड आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्याबरोबरच गडकोट संवर्धन आणि स्वच्छतेच्या उपक्रमांनाही संस्थेने चालना दिली आहे.

आमदार मांडेकर यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित गौरव सोहळ्यात किरणभाऊ राऊत, संदीपभाऊ खुटवड आणि सिताताई खुळे यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष राजेश इंगळे, मोहिमप्रमुख व सदस्यांचा सन्मान करण्यात आला. 'चांडाळ चौकडी' फेम अभिनेते रामभाऊ जगताप यांच्या माध्यमातून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रा. अमर भोसले, प्रा. भरत खोमणे, मारुती वागस्कर, डॉ. संजय वाघमोरे, तुषार चौधरी, अमोल बडे, अक्षय ओहळ, ईश्वर कोठारे, तारा चांदगुडे, राजवीर रोकडे, आदित्य खोमणे, संदीप गवळी आणि संगिता इंगळे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

## न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगावमध्ये योग-प्राणायाम, हिंदी दिन व गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचा उत्साहपूर्ण संगम

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

मढेवडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये योग-प्राणायामातून आरोग्य व मानसिक एकाग्रता, हिंदी दिनातून भाषिक समृद्धी आणि गणेशमूर्ती निर्मितीतून विद्यार्थ्यांच्या कलात्मक सर्जनशीलतेचा त्रिवेणी संगम पहायला मिळाला.



गुरुकुल विभागाच्या वतीने आयोजित योग व प्राणायाम उपक्रमात योगाचार्य कुलांगे व पूजा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रकार उत्स्फूर्तपणे केले. योगामुळे शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक एकाग्रता, सकारात्मक विचार आणि प्रसन्नता वाढण्यास मदत होते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

हिंदी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी बहुभाषेचे महत्त्व, वृक्षांचे उपयोग, हिंदीतील कहावतें व चुटकुले, हिरव्या भाज्यांचे महत्त्व तसेच हिंदी भाषा गीत व नृत्य यांचे प्रभावी सादरीकरण केले. विविध कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेची गोडी, बहुभाषिकतेचे महत्त्व आणि सामाजिक संदेश अतिशय सुंदर पद्धतीने मांडले. स्वरा मासाळ व अंजली मंगवडे यांनी सूत्रसंचालन केले. शंकर यदलोड व लक्ष्मी बोलणे यांनी शिक्षक म्हणून मार्गदर्शन करत बहुभाषेचे महत्त्व विशद केले.

तसेच गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत संतोष भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मातीला कलात्मक आकार देत आकर्षक पर्यावणपुरक गणेशमूर्ती साकारल्या. या उपक्रमांना मुख्याध्यापक हौसराव दांगडे व पर्यवेक्षक विलास सुलाखे यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रम यशस्वीतेसाठी मिनाक्षी कदम, सुजाता डाके, राजेंद्र शेळके, विकास चव्हाण, मनीषा व्यवहारे, नवनाथ पवार, वैभव काळुखे, प्रणव नलगे, महादेवी माने, सारिका साळवे, छाया ससाणे, किरण लाळगे, सुनील घोडके, रवींद्र पवार व गणेश इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पेट्रोलसाठी शंभर रुपये मागितल्याने दोघा भावांना मारहाण करत ठार मारण्याची धमकी; शेवगाव पोलिसांत तिघांविरुद्ध तक्रार

**शेवगाव । वीरभूमी–**

ओळखीच्या व्यक्तीला मोटारसायकल दिल्यानंतर तिचे पेट्रोल संपल्याने पेट्रोलसाठी शंभर रुपये मागितल्याच्या रागातून दोघा भावांना शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. यावेळी एकाला कड्याने डोक्यात मारून, तर दुसऱ्याच्या गालावर चाकूने दुखापत केल्याची घटना घडली. तसेच कट्ट्याने ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार शेवगाव पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे.

याप्रकरणी मोहम्मदजैद समद काझी (वय १९, रा. शेवगाव) यांनी यश संजय परमेश्वर, टिल्ल्या पिसाळ आणि जहीर उर्फ जज्या नवाब शेख (सर्व रा. शेवगाव) यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, रविवारी (दि. १३) दुपारी चुलत भाऊ फरहान याच्या मोटारसायकलवरून फुटबॉलची मॅच पाहण्यासाठी म्हसोबानगर येथे गेलो होतो. दुपारी चारच्या सुमारास यश परमेश्वर व टिल्ल्या पिसाळ तेथे आले. 'दोन मिनिटांत जाऊन येतो,' असे सांगून त्यांनी मोटारसायकल नेली. मात्र, सायंकाळी सात वाजले तरी मोटारसायकल परत केली नाही.

त्यानंतर रात्री साडेआठच्या सुमारास आम्ही कामानिमित्त मिरी रस्त्याला गेलो असता, सव्वानऊच्या सुमारास न्यायालयासमोर यश व टिल्ल्या मोटारसायकल घेऊन आले. मोटारसायकलचे पेट्रोल संपलेले असल्याने पेट्रोलसाठी शंभर रुपये देण्याची मागणी केली. याचा राग आल्याने त्यांनी शिवीगाळ व दमदाटी सुरू केली. समजावून सांगत असताना दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यश याने हातातील कड्याने डोक्यात मारून जखमी केले, तर टिल्ल्या याने चाकूने डाव्या गालावर दुखापत केली. भाऊ सोडवण्यासाठी आला असता त्यालाही दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यावेळी जहीर उर्फ जज्या नवाब शेख तेथे आला. यश याने आम्ही पेट्रोलसाठी पैसे मागत असल्याचे त्याला सांगितल्यानंतर जज्यानेही दोघांना शिवीगाळ व दमदाटी करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच 'तुम्हाला कट्ट्याने मारून टाकू,' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.


त्यानंतर भावाने आम्हाला शेवगाव पोलिस ठाण्यात आणले. पोलिसांनी जखमीला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले. दोघांनी ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतले. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल आजिनाथ बडे करीत आहेत.

### घटनेचा गांभीर्याने तपास करण्याची मागणी

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष प्रीतम गर्जे यांनी माध्यमांशी बोलताना या घटनेचा तीव्र निषेध केला. गणेशोत्सवाच्या काळात चाकूने वार करून 'कट्ट्याने मारून टाकू' अशी धमकी देण्याची घटना गंभीर असून, पोलिसांनी याची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांचा इतिहास तपासावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या घटनेसंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज आपल्याकडे आले असल्याचा दावाही त्यांनी केला.

वीरभूमी

■ मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६



## गणपती बाप्पा मोरया

# ‘सेल्फी विथ गणेशा’



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : ग्रामपंचायत सदस्य रसिक पाटील यांच्या घरचा गणपती, पुनाडे उरण



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : श्री. अशोक आघवणे सर व सहकुटुंब, रा. शेवगाव



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : श्रेयस सुरज अकोलकर, मल्हार चौक, अहिल्यानगर



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : प्राचार्य संपत दसपुते समवेत सर्व शिक्षक वृंद, चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चापडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : श्री संत गाडगे महाराज छात्रालय व कन्या छात्रालय, चापडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : शीघ्र कवी श्री. राजेंद्र उदारे, रा. पाथर्डी



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : कृष्णा रेसिडेन्सी गणेशोत्सव मंडळ, उरुळी कांचन, जि. पुणे



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : श्री. विकास पाठक व सौ. शामल पाठक, रा. छत्रपती संभाजीनगर



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : स्वरांजली, रेवा, सरला उनवणे, रोहन उनवणे, मंदा उनवणे, दत्तात्रय उनवणे रा. निघोज, ता. पारनेर.



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : व्यंकटेश कुलकर्णी, प्रा. जगन्नाथ मठ, प्रा. अमरेश सिंह, सुधीर पारोलकर, विनोदकुमार गांधी, रा. युथिका सोसायटी, बाणेर, पुणे.

**तुमचाही सेल्फी पाठवा आणि उद्याच्या पानात स्वतःला पहा!**

**येथे पाठवा आपले फोटो**

www.veerbhuminews.com
WhatsApp contact

व्हाट्स ॲप क्यू आर कोड स्कॅन करा.

९४२०८०२१४५ | mahadevdale@gmail.com



■ वीरभूमी-‘सेल्फी विथ गणेशा’ : संत ज्ञानेश्वर गणेश मित्र मंडळ, बेलगाव, ता. शेवगाव